अति. महा. आयुक्त (ज) कार्यालय,
पुणे महानगरपालिका, पुणे–५.
जा.क्र. :– अतिमआ/साप्रवि/आस्था/७५२
दिनांक :– ०८/०५/२०१५

–: कार्यालयीन आदेश :–

विषय :– श्री. बी. के. दहिफळे, प्रशासकीय अधिकारी, शिक्षण मंडळ यांचे अर्जित रजा कालावधीतील कामकाज व्यवस्थेबाबत.

संदर्भ :– १) शिक्षण मंडळ, पुणे मनपा जावक क्रं. शिमं/९०६, दिनांक ०६/०५/२०१५.
२) मा. महापालिका आयुक्त यांचा ठराव क्रं. १/११६, दिनांक ०८/०५/२०१५.

पुणे महानगरपालिका शिक्षण मंडळाकडील प्रशासकीय अधिकारी, शिक्षण मंडळ या पदावर कार्यरत असलेले श्री. बी. के. दहिफळे, यांनी संदर्भ क्र. १ अन्वये दिनांक ११/०५/२०१५ ते दिनांक २०/०६/२०१५ अखेर अर्जित रजा मिळणेस विनंती अर्ज केला आहे. मा. महापालिका आयुक्त यांनी दिनांक ११/०५/२०१५ ते ०३/०६/२०१५ अखेर अर्जित रजेस संदर्भ क्रं २ चे ठरावान्वये मान्यता दिली आहे.

श्री. बी. के. दहिफळे, यांचेकडील प्रशासकीय अधिकारी, शिक्षण मंडळ या पदाचा अतिरिक्त पदभार श्री. शिवाजी दौंडकर, मुख्य कामगार अधिकारी यांचेकडे उपरोक्त रजा कालावधीत / पुढील आदेश होईपर्यंत सोपविणेस संदर्भ क्र. २ चे ठरावान्वये मा. महापालिका आयुक्त यांनी मान्यता दिली आहे.

श्री. शिवाजी दौंडकर, मुख्य कामगार अधिकारी यांनी स्वत:च्या पदाचे कामकाज सांभाळून प्रशासकीय अधिकारी, शिक्षण मंडळ या पदाचे संपुर्ण कामकाज उपरोक्त रजा कालावधीत / पुढील आदेश होईपर्यंत करावयाचे आहे.

श्री. शिवाजी दौंडकर, मुख्य कामगार अधिकारी यांनी वरीलप्रमाणे अतिरिक्त पदभार स्विकृत केलेबाबतचे निवेदन आमचेकडे सादर करावयाचे आहे.

तरी, संबंधित खातेप्रमुख यांनी जरूर ती पुढील तजविज करावी.

०८/०५

(राजेंद्र जगताप)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज),
पुणे महानगरपालिका.

प्रत:– **सर्व संबंधित मा.खातेप्रमुख,**
पुणे महानगरपालिका.
यांजकडे माहिती व पुढील तजविजीसाठी रवाना . . . .

०८/०५/१५

(मंगेश जोशी)
उप आयुक्त (सा.प्र.)
पुणे महानगरपालिका.

एस–१ (अधिकारी) – १४६७